MHJN040026532024

नि.दि.दा. क्र.३३३/२०२४
सुधाकर वि. तिर्थराज व इतर

## नि.क्र.९० वर आदेश पारीत

१. अर्जदाराने प्रस्तूत अर्ज दाखल करून अशी विनंती केली आहे की, प्रतिवादीने दि.२७.०३.२०१८ रोजीचा मूळ करारनामा दाखल करावा, असे आदेश होवून सदर दस्तऐवज हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवून हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल आल्यानंतर पूढील तारखेपर्यंत वादीस साक्ष पूरावा नोंदविण्यासाठी अवसर देण्यात यावा.

२. वादीच्या कथनाप्रमाणे वादीने त्याचा साक्ष पूरावा सूरू होण्याच्यावेळेस सदर करारनामा प्रतिवादीने दाखल करावा अशी विनंती नि.क्र.३९ कडील अर्जाप्रमाणे केली होती व सदर अर्जावर आदेश झाल्यानंतर वादीने पाच साक्षीदार तपासले व हस्ताक्षर तज्ञांचा पूरावा वगळता इतर सर्व पूरावा संपला आहे असे नमूद केले. परंतू, प्रतिवादी दि.२७.०३.२०१८ रोजीचा मूळ करारनामा न्यायालयात दाखल करीत नसल्याने तो हस्ताक्षर तज्ञांकडे पाठविता येत नाही आणि अशा परिस्थितीत, सदर करारनामा खरा आहे किंवा खोटा आहे यासंबंधी वादी पूरावा देवू शकत नाही. करीता पूढील साक्ष/पूरावा नोंदवण्यासाठी वादीने अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादीने नि.क्र.९२ कडे म्हणणे दाखल केले व वादीच्या अर्जास जोरदार हरकत घेतली की, सदर करारनामा नियमित दावा क्र.३२९/२०२४ चा भाग आहे आणि प्रतिवादीचा पूरावा अजून सूरू झालेला नाही. तरी वादीने प्रतिवादीच्या कागदपत्रांवर विसंबून न राहता त्याची केस स्वबळावर सिध्द करावी. प्रस्तूत अर्ज फक्त वेळ काढण्यासाठी दाखल केला गेला असून वादीस दंड आकारून अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. दोन्ही बाजूंचा यूक्तीवाद ऐकला. अभिलेखावरून असे दिसून येते की, वादीने याआधीही नि.क्र.३९ कडे अर्ज दाखल करून सदर करारनामा हस्ताक्षर तज्ञांकडे पाठविण्यात यावा अशी विनंती केली होती. सदर अर्जावर दि.०५.११.२०२५ ला

झालेल्या आदेशाप्रमाणे जेव्हा मूळ दस्तऐवज या न्यायालयात प्रतिवादी दाखल करेल त्यावेळी ते दस्तऐवज हस्ताक्षर तज्ञांकडे पाठवायचे की नाही हा मूद्दा विचारात घेतला जाईल. यावेळी प्रतिवादीच्या वकीलांनी ***मा. उच्च न्यायालय, मद्रास यांचे आर. बालाचंद्रन याविरूध्द एस. ग्यानसिंगामनी राजादूराई (सी. आर. पी.) (एन.पी.डी.) (एम.डी.) क्र.६६०/२०१९*** मधील न्यायनिवाडा दाखल करून यूक्तीवाद केला की, प्रतिवादीने त्याच्या कैफीयतीत आधार घेतलेले कागदपत्रे दाखल करण्यासाठी त्यावर दबाव आणला जावू शकत नाही. तसेच, प्रतिवादीतर्फे दाखल मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या ***यूनियन ऑफ इंडीया विरूध्द वसावी को–ऑपरेटीव सोसायटी (सीवील अपील क्र.४७०२/२००४) दि.०७.०१.२०१४*** रोजीच्या न्यायनिर्णयानुसार, वादीने आपली केस स्वबळावर सिध्द करावी.

५. वर नमुद परिस्थिती बघता आणि विशेषत: नि.क्र.३९ वरील आदेश विचारात घेता प्रस्तूत अर्ज विचारात घेता येणार नाही.

येणेप्रमाणे प्रस्तूत अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

Digitally signed by SIMA SACHIN JAIN
Date: 2026.04.24 17:45:20 +0530

दि. २४/०४/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर),
अंबड

<u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :- एस.एम. सपकाळ
न्यायालयाचे नाव :- सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंबड

स्वा/
**लघुलेखक**